मंगळवार, ११ जानेवारी २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक १७५
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

अंतरंग

कामोठ्यात होणार छत्रपती शिवरायांचे भव्य स्मारक/३
किरवली ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चा/५
आजपासून भारत विरुद्ध आफ्रिका निर्णायक कसोटी/६

## बूस्टर डोस लसीकरणास उत्साहात प्रारंभ



**अलिबाग** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केल्यानुसार अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी, फ्रंटलाईन वर्कर आणि ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी कोरोना प्रतिबंधक लसीचा प्रिकॉशनरी (बूस्टर) डोस देण्यास सोमवार (दि. १०) पासून देशभरात सुरुवात झाली आहे. रायगड जिल्ह्यात या मोहिमेची सुरुवात जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर आणि अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या उपस्थितीत रायगड पोलीस मुख्यालय येथे करण्यात आली. पहिल्या दिवशी रायगड जिल्ह्यात सायंकाळी ६ वाजेपर्यंत एक हजार ४६ लाभार्थ्यांना कोरोना प्रतिबंधक लसीचा बूस्टर डोस देण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा लसीकरण अधिकारी डॉ. वंदन पाटील यांनी दिली.

### पंजाब सरकारसह काँग्रेसचा जाहीर निषेध

# आम्ही पंतप्रधान मोदी यांच्यासोबत!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंजाबमधील घटनेच्या पार्श्वभूमीवर आम्ही सर्व नागरिक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत आहोत हे दर्शविण्यासाठी पनवेल तालुका व शहर भाजपच्या वतीने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे फलक लावून सोमवारी (दि. १०) स्वाक्षरी मोहीम घेण्यात आली. या स्वाक्षरी मोहिमेला भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रारंभ झाला. पंजाबमधील काँग्रेस सरकारने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुरक्षाव्यवस्थेत दाखविलेल्या निष्काळजीपणाचा या वेळी जाहीर निषेध करण्यात आला.

देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर पंजाबमध्ये प्राणांतिक संकट ओढवले होते. त्यांचा ज्या राज्यात दौरा होता त्या पंजाबमधील काँग्रेस सरकारने पंतप्रधानांच्या सुरक्षेबाबत अक्षम्य दिरंगाई, बेजबाबदारपणा करून एक प्रकारे विघटनवादी शक्तींना मदत केली. त्यामुळे या घटनेचा आणि काँग्रेस सरकारचा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेलमध्ये तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या वेळी आयोजित वुई सपोर्ट पीएम मोदी या मोहिमेत कार्यकर्ते आणि नागरिकांनी आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत आहोत असा संदेश व पाठिंबा देऊन स्वाक्षरी करीत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दीर्घायुष्य लाभण्यासाठी विरूपाक्ष मंदिरात महामृत्युंजय जप करण्यात आला. (पान २ वर..)

### पनवेलमध्ये भाजपची स्वाक्षरी मोहीम



### पंतप्रधान मोदींचे काम काँग्रेसच्या डोळ्यांत खुपतेय -आमदार प्रशांत ठाकूर



या वेळी भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, जेव्हा देशाचे पंतप्रधान राष्ट्रीय स्मारकाचे लोकार्पण करण्यासाठी पंजाबमध्ये गेले तेव्हा तो कार्यक्रम पक्षाचा नसून शासकीय होता, तसेच वेगवेगळ्या कार्यक्रमांचे भूमिपूजन शासकीय कार्यक्रमातून होणार होते. खराब हवामानामुळे पंतप्रधान हेलिकॉप्टरने न जाता रस्त्याने जाणार असल्याचे ठरल्याने तेथे बंदोबस्त ठेवणे आवश्यक होते, मात्र पंजाब सरकारकडून सुरक्षाव्यवस्थेत गंभीर चूक झाली. काँग्रेसचे मुख्यमंत्री प्रोटोकॉल न पाळता जाणूनबुजून पंतप्रधानांना विमानतळावर भेटायला गेले नाहीत. त्यानंतर जी निदर्शने झाली त्यातही काँग्रेसचे समर्थक होते. निदर्शने करणाऱ्यांवर पंजाब सरकारने कारवाई केली नाही. त्याबाबत पाठपुरावा घेण्यासाठी फोन केला तर तोही घेतला नाही. अशा परिस्थितीत पंतप्रधान एका असुरक्षित ठिकाणी २० मिनिटे होते. ही परिस्थिती निवळण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी कार्यवाही करणे आवश्यक असतानाही त्यांनी काही केले नाही. याचे कारण २०१४ सालापासून पंतप्रधान मोदी यांनी केलेले काम हे काँग्रेसच्या डोळ्यांत खूपत आहे.

आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कामाचे जागतिक पातळीवर कौतुक होत आहे. भारतात कधीही न घडलेली परिवर्तने घडत आहेत, नवा भारत घडत आहे. हे काँग्रेस पक्षाला पाहवत नाही. म्हणून पंतप्रधानांवर टीका करणे, त्यांना अपयश येईल यासाठी सगळ्या स्तरातून प्रयत्न काँग्रेस पक्ष करीत आहेत. याआधीही हे दिसून आले आहे आणि आता पंजाबच्या घटनेतूनही दिसून आले आहे. पंतप्रधानांच्या सुरक्षिततेची तमा त्यांनी बाळगली नाही.

# पदाधिकारी, कार्यकर्त्यांना शेकापने केले कर्जबाजारी

■ शिवसेना आमदार महेंद्र दळवी यांची टीका



**पाली : प्रतिनिधी**

शेतकरी कामगार पक्षाने पदाधिकारी व कार्यकर्त्यांना डबे घेऊन कामाला जावे इतके कर्जबाजारी केले असल्याची जळजळीत टीका शिवसेनेचे रायगड जिल्हाप्रमुख आमदार महेंद्र दळवी यांनी केली. ते सुधागड तालुक्यातील बेणसे येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलत होते.

बेणसे ग्रामपंचायतीच्या वतीने दिव्यांगांना रविवारी (दि. ९) धनादेश व वस्तूंचे वाटप करण्यात आले. या वेळी बोलताना आमदार दळवी यांनी शेकापचे नेतृत्व व कार्यपद्धतीवर सडकून टीका केली. त्याच वेळी जिल्हा परिषद निवडणूक शिवसेना स्वबळावर लढवणार असल्याचे संकेत त्यांनी दिले.

या कार्यक्रमास शिवसेनेचे जिल्हा सल्लागार तथा जि. प. सदस्य किशोर जैन, उपजिल्हाप्रमुख अविनाश म्हात्रे, माजी बांधकाम सभापती संजय जांभळे, पेण तालुकाप्रमुख तुषार मानकवळे, अलिबाग तालुकाप्रमुख राजा केणी, कामगार नेते दीपक रनावडे, अरुण कुथे, उपविभागप्रमुख अशोक भोय, महिला संघटक दीपश्री पोटफोडे, कल्पना पाटील, सरपंच मधुकर पारधी आदी उपस्थित होते.

## खालापूर नगरपंचायत निवडणुकीत शिवसेना वि. शेकाप थेट सामना

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर नगरपंचायत निवडणुकीत वॉर्ड क्र. २ मध्ये शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेना अशी सरळ लढत होणार आहे. शेकापकडून संतोष जंगम, तर शिवसेनेकडून मारुती पवार निवडणूक रिंगणात आहेत.

१८ जानेवारी रोजी होत असलेल्या या निवडणुकीसाठी एकूण सहा अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी दोन अर्ज बाद झाल्याने चार उमेदवार निवडणूक लढविण्यासाठी पात्र ठरले होते. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी शेकापच्या शिवानी जंगम आणि अपक्ष दीपाली पेडणेकर यांनी माघार घेतल्याने आता शेकापकडून संतोष जंगम आणि शिवसेनेकडून मारुती पवार हे दोघे एकमेकांविरुद्ध निवडणुकीला सामोरे जात आहेत.

खालापूर नगरपंचायतीची प्रभाग क्र. २मधील निवडणूक ओबीसी आरक्षणावरून निर्माण झालेल्या न्यायालयीन निर्णयामुळे अडचणीत सापडली होती. या प्रभागाची निवडणूक पुढे ढकलण्यात आली होती. अखेर ओबीसी आरक्षण रद्द झाल्याने या प्रभागातून सर्वसाधारण उमेदवारांना निवडणूक लढविण्याची संधी मिळाली आहे.

## निवडक

### पंतप्रधानांच्या सुरक्षा त्रुटीच्या चौकशीसाठी समिती स्थापन

**नवी दिल्ली** : पंजाबमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुरक्षेतील त्रूटीप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने माजी न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने सांगितले की, सुरक्षेमध्ये त्रूटी राहिली हे खरे आहे. खुद्द पंजाब सरकारने ही कबुली दिली आहे. आता एसपीजी कायद्याचे उल्लंघन झाले का याची चौकशी करायची आहे.

### केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांना कोरोनाचा संसर्ग

**नवी दिल्ली** : देशात कोरोना महामारीची तिसरी लाट आली असून अनेक जण कोरोनाच्या विळख्यात सापडत आहेत. देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनाही कोरोनाचा संसर्ग झाला आहे. त्यांनी स्वत: ट्वीट करून याबाबत माहिती दिली, तसेच संपर्कात आलेल्यांनी तपासणी करून घ्यावी, असे आवाहन केले आहे.

## पनवेल मनपा उपमहापौर, सभापती निवडणुकीसाठी भाजपचे अर्ज दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या उपमहापौर, स्थायी समिती सभापती, महिला व बालकल्याण सभापती आणि प्रभाग समित्यांच्या सभापतीपदासाठी मंगळवारी (दि. ११) निवडणूक होणार आहे. उपमहापौर जगदिश गायकवाड यांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या, तसेच स्थायी समिती सभापती, महिला व बालकल्याण सभापती आणि प्रभाग समितीच्या जागांसाठी सोमवारी (दि. १०) भाजप उमेदवारांचे अर्ज दाखल झाले.



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

या निवडणुकीत उपमहापौरपदासाठी भाजपकडून नगरसेविका सीताताई पाटील, स्थायी समिती सभापतीसाठी नगरसेवक ॲड. नरेश ठाकूर, महिला व बालकल्याण सभापतीसाठी नगरसेविका हर्षदा उपाध्याय, तसेच प्रभाग समिती ‘अ’साठी नगरसेविका संजना कदम, ‘ब’साठी नगरसेविका प्रमिला पाटील, ‘क’साठी नगरसेविका अरुणा भगत, तर ‘ड’साठी नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे यांनी आपला उमेदवारी अर्ज महापालिकेचे सचिव तिलकराज खापर्डे आणि दशरथ भंडारी यांच्याकडे महापालिकेत दाखल केला. (पान २ वर..)

## उलवे नोडमध्ये पोंगल उत्सव साजरा

■ लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड तमिळ संगम फाऊंडेशनच्या वतीने सेक्टर १९मध्ये पोंगल उत्सव २०२२ आयोजित करण्यात आला होता. या उत्सवास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

तमिळ संगम फाऊंडेशनच्या वतीने दरवर्षी पोंगल उत्सव साजरा केला जातो. यंदाचे हे सहावे वर्ष होते. या कार्यक्रमास भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ कार्यकर्ते शरद खारकर, अमर म्हात्रे, शैलेश भगत, निलेश खारकर, ग्रामपंचायत सदस्य वितेश म्हात्रे, नंदकुमार ठाकूर, महिला मोर्चा उपाध्यक्ष समृद्धी अडसुळे, प्रिया मॅडम, अम्मा इंटरप्रायझेसचे संचालक व्ही. राजा, भाजप साऊथ सेलचे अध्यक्ष मसानम, उपाध्यक्ष कृष्णन, उलवे नोड तमिळ संगम फाऊंडेशनचे अध्यक्ष पेनिअल एस., उपाध्यक्ष अल्लाबक्ष, सचिव सुगुमार एम., खजिनदार सेल्वराज नैनार, समन्वयक मसानम राजराथनम, सहसचिव गणेश एस., बालन मोहन, सल्लागार संकरा नारायणम, राजेंद्रन पी., राजेंद्रन जी. एफ., दिनकरन पी., टी. पी. राजू यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.





या वेळी तमिळ संगम फाऊंडेशनच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले, तसेच पोंगल सणानिमित्त नागरिकांना लोकनेते रामशेठ ठाकूर व अन्य मान्यवरांच्या हस्ते अन्नधान्य देण्यात आले.

## सुधागडातील गिर्यारोहकांची सिंधुताईंना अनोखी मानवंदना

वानरलिंगी सुळक्यावर आदरांजली वाहून फडकविला तिरंगा



> **सिंधुताईंचे कार्य महान आहे. त्यांच्या जाण्याने अनाथांची माय हरपली आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहून त्यांच्या देदिप्यमान कार्याला सलाम करण्यासाठी ही अनोखी मानवंदना देण्यात आली.**
> **-मॅकमोहन हुले, संस्थापक, मॅकविला द जंगल यार्ड**

**पाली : प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ यांचे नुकतेच निधन झाले. सुधागड तालुक्यातील मॅकविला द जंगल यार्डमधील साहसी प्रस्तरारोहकांनी पुणे जिल्ह्याच्या जुन्नर तालुक्यातील वानरलिंगी हा ४०० फूट सुळका सर करून ‘अनाथांची माय’ सिंधुताईंना भावपूर्ण आदरांजली वाहिली आणि गिर्यारोहण मानवंदना दिली, तसेच भारताचा झेंडा फडकविण्यात आला.

या मोहिमेत सुधागड तालुक्यातील प्रस्तरारोहक व मॅकविला द जंगल यार्डचे संस्थापक मॅकमोहन हुले आणि त्यांचे सहकारी प्रणय पाटील, अभिजित राजगुरू व विकी घोडके सहभागी होते. त्यांनी ७ जानेवारी रोजी चार तासांत वानरलिंगी सुळका सर केला व तेथे सिंधुताईंना अनोखी आदरांजली व गिर्यारोहण मानवंदना दिली.

## माथेरान गारठले!

तापमानाचा पारा १०.६ अंशावर

**कर्जत : बातमीदार**

थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरानमध्ये कडाक्याची थंडी पडली असून तापमानाने यंदाच्या वर्षातील नीचांक गाठला आहे. माथेरानमध्ये रविवारी (दि. ९) तापमान १०.६ अंश सेल्सियस इतके नोंद झाले. पर्यटक मात्र या गुलाबी थंडीची मजा घेत आहेत.

माथेरान हे २६३६ फूट उंचावर असलेले पर्यटनस्थळ असून मुंबई-पुण्यापासून जवळ आहे. घनदाट झाडी आणि जंगलाने व्यापलेले माथेरान हिवाळ्यात अधिकच खुलून दिसते. सध्या दिवसागणिक येथील तापमानाचा पारा खाली घसरू लागला आहे. रविवारी सकाळपासून थंडीचा जोर होता. तो संध्याकाळपर्यंत वाढतच गेला. येथील तापमान १०.६ अंश इतके नोंदवले गेल्याची माहिती नगरपालिकेचे तापमान निरीक्षक अन्सार महापुळे यांनी दिली.



पान १ वरून

## आम्ही पंतप्रधान मोदी यांच्यासोबत!



या वेळी भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, शहर सरचिटणीस अमरिश मोकल, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, शहर अध्यक्ष रोहित जगताप, दिनेश खानावकर, अभिषेक भोपी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

**पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दीर्घायुष्यासाठी महामृत्युंजय जप**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आयुष्य वाढावे यासाठी पनवेल शहरातील विरुपाक्ष मंदिरात आज महामृत्युंजय मंत्राचा जप केला जात आहे. पक्ष कार्यालयात राज्यघटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोसमोर उभे राहून काँग्रेस पक्षाचा भाजपने निषेध केला. पंजाबच्या घटनेमुळे भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते संतप्त झालेले आहेत. जनतेच्या मनातही याबद्दल संताप आहे. लोक येऊन स्वाक्षऱ्या करून आपला निषेध व्यक्त करीत आहेत, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी सांगितले.

## पनवेल मनपा उपमहापौर, सभापती निवडणुकीसाठी भाजपचे अर्ज दाखल

या वेळी महापौर डॉ. कविता चौतमोल, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, प्रभाग समिती सभापती समीर ठाकूर, सुशीला घरत, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, राजू सोनी, अमर पाटील, मनोज भुजबळ, विकास घरत, गोपीनाथ भगत, प्रकाश बिनेदार, निलेश बाविस्कर, अभिमन्यू पाटील, प्रवीण पाटील, नगरसेविका चारुशीला घरत, रूचिता लोंढे, कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, प्रदीप भगत आदी उपस्थित होते. महापालिकेमध्ये भारतीय जनता पक्षाचे वर्चस्व पाहता या निवडणुकीत भाजपचे उमेदवार विजयी होणार हे स्पष्ट असून औपचारिकता बाकी आहे.















**पनवेल : कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजच्या शिक्षिका राजश्री रमेश यादव (वैदू) यांना २०२१ वर्षाचा ग्लोबल टीचर अवॉर्ड (१२० देशांतून) व २०२१ वर्षाचा नॅशनल स्कूल टीचर अवॉर्ड मिळाला आहे. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी राजश्री यादव (वैदू) यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख व अन्य मान्यवर उपस्थित होते.**

## पंतप्रधानांच्या दीर्घायुष्यासाठी भाजयुमोतर्फे महामृत्युंजय जप

**पनवेल : वार्ताहर**



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दीर्घायुष्य लाभावे याकरिता सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांदा या ठिकाणी बांदेश्वर मंदिरात भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने महामृत्युंजय जप करण्यात आला. भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील यांनी सहकाऱ्यांसह श्री बांदेश्वरच्या चरणी साकडे घातले.

या वेळी प्रदेश सचिव अमृत मारणे, सुजित थिटे, सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष भाई सावंत, सिंधुदुर्ग जिल्ह्याचे व बांदा मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### जाहीर प्रसिद्धीकरण

कमळ महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या, मारूती अपार्टमेंट, टिळक रोड, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड या सहकारी संस्थेचा सन २०२२ ते २०२७ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करण्यांत येत आहे. सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. १२-०१-२०२२ ते १८-०१-२०२२ नामनिर्देशन पत्र छानननी दि. १९-०१-२०२२, नामनिर्देशन माघारी दि. २०-०१-२०२२ ते ०३-०२-२०२२ व आवश्यकतेनुसार मतदान दि. ०९-०२-२०२२ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सूचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, पनवेल, सुशिला निवास, मिडलक्लास हौसिंग सोसा. पनवेल यांचे कार्यालयात पहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(बालाजी वाघमारे)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल लॉर्ड अय्यप्पा एज्युकेशन संस्था यांनी त्यांचे मालकीची मौजे नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ८९ हिस्सा नं. १ या मिळकतीमध्ये येण्या-जाण्याच्या रस्त्याकरिता मौजे नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ८९ हिस्सा नं. ४अ या मिळकतीमधील श्री. अनंत सखाराम कराळे यांचे मालकीच्या हे.-००, आर.-२७, पॉ.-०० या क्षेत्रापैकी कर्जत कल्याण हायवेस लागून दक्षिण दिशेपासून उत्तर दिशेकडे ९ मिटर रुंद व ४३ मिटर लांब त्यानंतर उजवीकडे वळून पूर्व दिशेस ९ मिटर रुंद व १२ मिटर लांब रस्ता ज्याचे अंदाजे क्षेत्र हे.-००, आर.-०५, पॉ.-०० इतके घेण्याचे निश्चित केलेले आहे. तसेच श्री. अनंत सखाराम कराळे यांचे मालकीच्या मौजे नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ८९ हिस्सा नं. ३ क्षेत्र हे.-००, आर.-०५, पॉ.-३० आकार रु.-०, पै.-२५ ही मिळकत माझे अशिल लॉर्ड अय्यप्पा एज्युकेशन संस्था यांनी अदलाबदलीपत्राद्वारे घेण्याचे निश्चित केलेले आहे. सदर मिळकतींचे बदल्यामध्ये माझे अशिलांचे मालकीची मौजे नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ८९ हिस्सा नं. १ एकूण क्षेत्र हे.-००, आर.-७५, पॉ.-१० आकार रु.-६, पै.-७५ यापैकी हे.-००, आर.-२०, पॉ.-०० इतके क्षेत्र नोंदणीकृत अदलाबदलीपत्राद्वारे श्री. अनंत सखाराम कराळे यांना देण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयाणा पावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमूद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतींबाबत व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**दिनांक : ११/०१/२०२२**

**सही/-**
**भुपेश तानाजी पेमारे**
**(ॲडव्होकेट)**
**कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर, ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१**
**मो.नं. - ९१५८२७७७२८**

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत कब्जेदार सदरी नाव असलेल्या जमीन मिळकतीचे मालक/कब्जेदार आमचे अशिल **श्री. नितीन अनंत कोळी, रा. मु. पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड** हे मिळकत खरेदी करण्याचा व्यवहार **मे. साक्षी एंटरप्रायझेस तर्फे प्रोप्रा. श्री. संजय जगन्नाथ कोळी** यांच्याशी करणार आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - शहाबाज बेलापूर रोड, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील**

| शॉप नं. | सेक्टर | क्षेत्र चौ.फुट |
|---|---|---|
| ०१ | १९ | २७५ चौ.फुट |

तरी वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीच्या कोणताही गहाण, दान, बक्षीस, खरेदी साठेकरार, मिळकत विकसीत करण्याबाबतचा करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, बोजा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा महसुली वाद असल्यास त्यांच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे तसेच त्यांच्या पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे हरकत मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजाविरहित आहे, असे समजून वर नमूद केलेले जमीन मिळकतीचे मालक **मे. साक्षी एंटरप्रायझेस तर्फे प्रोप्रा. श्री. संजय जगन्नाथ कोळी** यांच्याशी कायदेशीर महसूल कायद्याप्रमाणे कायदेशीर बाबींची पूर्तता करून व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक :- १०/०१/२०२२**

**सही /-**
**ॲड. शुभांगी केदार लाड**
पत्ता - शॉप नं. ०२, इंदिरा अंजली को.ऑप. हौ. सोसायटी, जुन्या पोस्ट ऑफीससमोर, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६
मो.नं. ९३२४४१६१०५

### जाहीर नोटीस

**टेनन्सी अपिल क्र.१२/२०१६**

प्रती,

१. गणेश मारुती म्हसकर,
२. कैलास मारुती म्हसकर,
३. अनुसया मारुती म्हसकर,
अ.क्र. १ ते ३ रा.मु. भडवळ, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड,
४. लता तुकाराम विरले,
५. कल्पना हिरामण मसणे,
अ.क्र. ४ व ५ रा. कामत हॉटेलच्या शेजारी, खंडाळा स्टेशन समोर, मु. खंडाळा, ता. वडगाव, जि. पुणे
६. कमला चिंतामण धुळे,
रा.मु. चोरावळे, पो. वाकस, ता. कर्जत, जि. रायगड.
७. गंगु मल्हार डायरे,
रा.मु. अंत्राट, पो. वाकस, ता. कर्जत, जि. रायगड.
८. आशा शरद खंबाळे,
रा.मु.पो. वाकस, ता. कर्जत, जि. रायगड.
९. संजय राम भवारे,
रा.मु.पो. नेरळ, पाडा गेट जवळ, ता. कर्जत, जि. रायगड.
१०. जोत्स्ना सतीश भोपी,
रा. पाटील आळी, बदलापूर, ता. अंबरनाथ, ठाणे.
११. अश्विनी आदेश कांबरी,
रा. मुळगाव, बदलापूर, ता. अंबरनाथ, ठाणे.

} अपिलार्थी

**विरुद्ध**

१. फझलुद्दीन महम्मद हुसेन नजे,
रा.मु. दामत, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
२. करीम महम्मद हुसेन नजे,
रा.मु. आरजोली, पो. पडघा, ता. भिवंडी, जि. ठाणे.
३. मामुदा महम्मद हुसेन नजे,
रा.मु. दामत, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
४. हवमा महम्मद हुसेन नजे,
रा.मु. आरजोली, पो. पडघा, ता. भिवंडी, जि. ठाणे.
५. कै. गुलाम वसुल फजल नजे,
रा.मु. दामत, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड. (मयत)
अपीलातील सामनेवाले हेच वारस आहेत.
६. आनिस अब्दुल हमीद नजे,
रा.मु. दामत, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
७. इसाक अब्दुल हमीद नजे (मयत) वारस
७/१. श्री. रफिक इसाक नजे,
७/२. श्री. हसन इसाक नजे,
७/३. श्री. जब्बार इसाक नजे,
सर्व रा.मु. दामत, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
८. खैरु अब्दुल हमीद नजे,
रा.मु. गोरेगाव, ता. अंबरनाथ, जि. ठाणे.
९. गौस अब्दुल हमीद नजे (मयत) वारस
९/१. श्री. शकील गौस नजे,
९/२. श्री. नवेद गौस नजे,
९/३. श्री. इब्राहीम गौस नजे,
अ.क्र. ९/१ ते ९/३ सर्व रा.मु. दामत, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
१०. झेनाब हसन नजे,
रा.मु. दामत, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड,
११. आयेशा अन्वर नजे,
रा.मु. माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड.
१२. आसमा तसलिम मुल्ला,
रा. रायता, पो. वावळ, ता. ठाणे, जि. ठाणे.
१३. शकिरा इस्माईल पटेल,
रा. तळोजा, नवी मुंबई.
१४. जकीरा मुबारक सिद्दीकी,
रा. बेलापुर, नवी मुंबई.
१५. गुलाम रब्बानी अब्दुल रहिमान नजे,
१६. रशिदा फजलुद्दीन नजे,
१७. नशीर अब्दुल रहिमान नजे,
अ.क्र. १५ ते १७ रा.मु. दामत, पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

} सामनेवाले

---

तमाम जनतेस तसेच सामनेवाले / प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे-दामत, ता. कर्जत, जि. रायगड येथील तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण कर्जत यांचेकडील दावा क्र. ४९/२०१० दिनांक १८/१२/२०१५ चे आदेशाविरुद्ध अपिलार्थी / वादी यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे विलंब माफीचा अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये दिनांक-०५/०८/२०१६ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपीलाची पुढील सुनावणी दिनांक ११/०२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, हायड्रो कॉलनी दहिवली, कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| गाव | नवीन स.नं. हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| मौजे-दामत, ता. कर्जत, जि. रायगड | २२/१५ अ | ०-३६-० | ०-१७ |

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

**ठिकाण : कर्जत**
**दिनांक : ०५/०१/२०२२**

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जतकरिता**

### पनवेल महानगरपालिका
### जाहीर प्रकटन

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २१० अन्वये)
जा.क्र.पमपा/नरवि/रस्ते/२६-२२/प्र.क्र.०१/४०/२०२२
दिनांक : ०६/०१/२०२२

ज्याअर्थी, पूर्वाश्रमीच्या पनवेल नगरपरिषद हद्दीची सुधारित विकास योजना संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ३१(१) अन्वये अधिसूचना क्र. वि. यो. पनवेल (सु.)/टीपीव्ही-३/१६-९३/१६७६, दिनांक १६ मार्च १९९३ अन्वये मंजूरी दिलेली आहे आणि उक्त सुधारित विकास योजना दिनांक १५ मे १९९३ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, पनवेल नगरपरिषद हद्दीतील वगळलेल्या भागाची विकास योजना संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य यांनी अधिसूचना क्र. वि. यो. पनवेल (सु.)/ईपी/टीपीव्ही-३/५३-९४/२८२०, दिनांक २७ मार्च १९९४ अन्वये मंजूरी दिलेली आहे आणि उक्त वगळलेल्या भागाची विकास योजना दिनांक ०१ जुलै १९९४ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, पनवेल नगररचना परियोजना क्र.१ (प्र. फे.) अंतिम शासनाने दि. ३१/०८/२००९ रोजी मंजूर केली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३ च्या पोट कलम (४) नुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक पनप - २९१४/व्ही आय पी सं.क्र. ३०१/प्र.क्र. ३५४/नवि-२३, दि. २५ सप्टेंबर २०१६ अन्वये पनवेल नगरपरिषदेचे संपूर्ण क्षेत्र व २९ महसुली गावांच्या क्षेत्रासाठी पनवेल महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली असून ती दिनांक १ ऑक्टोबर २०१६ पासून अस्तित्वात आली आहे;

आणि ज्याअर्थी, पूर्वाश्रमीच्या पनवेल नगरपरिषद सुधारित मंजूर विकास योजना व मंजूर नगररचना परियोजनामधील रस्ते सध्याच्या सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने अरुंद आहेत व शहराची वाढती लोकसंख्या, वाहतूक व पार्कींगची गरज विचारात घेता उक्त रस्त्यांचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे पनवेल येथील पंचरत्न सर्कल ते छ. शिवाजी महाराज चौक पर्यंतचा विद्यमान १५.२४ मी. रुंदीचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २१० अन्वये १८.२४ मी. रूंदीची रेषा विहीत करणेबाबत निर्णय पनवेल महानगरपालिका स्थायी समिती सभा ठराव क्र. २३१, दि. ०६ मार्च २०२० अन्वये झाला आहे;

त्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २१० अनुसरून खालीलप्रमाणे रस्ता रूंदीकरणास मान्यता देण्यात आली आहे आणि रस्ता रूंदीकरण दर्शविणारा नकाशा नागरिकांचे माहिती व अवलोकनार्थ सहाय्यक संचालक, नगररचना पनवेल महानगरपालिका कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देणेत आला आहे.

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | विद्यमान रस्त्याची रूंदी | प्रस्तावित रस्त्याची रूंदी |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | पंचरत्न सर्कल ते छ. शिवाजी महाराज चौकपर्यंत | १५.२४ मी. | १८.२४ मी. (६० फुट) |

सर्व नागरिकांना कळविणेत येते की, ज्यांना वरील फेरबदलाबाबत सूचना व हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी हे जाहीर प्रकटन महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिद्ध झालेपासून तीस दिवसांचे आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करावे. सदर प्राप्त सूचना व हरकती प्रस्तावांचा अंतिम मंजूरीच्या वेळी विचार करण्यात येईल व मुदतीनंतर प्राप्त हरकती सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**ठिकाण :- पनवेल**
**दिनांक :- ०६/०१/२०२२**

**सही/-**
**(गणेश देशमुख)**
**आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

**परिशिष्ट -अ**

**रस्त्याचे संक्षिप्त विवरण**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे पनवेल येथील पंचरत्न सर्कल ते छ. शिवाजी महाराज चौकपर्यंतचा विद्यमान १५.२४ मी. रुंदीचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २१० अन्वये १८.२४ मी. रूंदीची नियमित रेषा विहीत करणे.

वरील रस्त्याचे रस्ता रुंदीकरणामुळे बाधित होणारे अंतिम भूखंड क्र. खालीलप्रमाणे आहेत.

| अनु.क्र. | महसुली गावाचे नाव | अंतिम भूखंड क्र. |
|---|---|---|
| १ | मौजे-पनवेल | २२१, २२२, २०८ ब, २०८ अ, २२३, २२४ अ, २०६, २०५, २२७, २२८, २२९ अ, २२९ ब, २३८, २३९/१, २३९/२, २४०, २४१, १९८ अ, १९८ ब |

**टीप :-** वरील रस्ता रुंदीकरणाची प्रत्यक्ष आखणी करतेवेळी वरील बाधित जागेव्यतिरिक्त इतर जागा बाधित होत असल्यास सदरची जागा ही प्रस्तावित रस्ता रुंदीकरणाचा भाग समजण्यात येईल.

**परिशिष्ट - ब**

प्रस्तावीत रस्ता रुंदीकरण संरेखांकन दर्शविणारा नकाशा नागरीकांच्या पाहणी करीता सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, पनवेल महानगरपालिका यांचे कार्यालयात खुला ठेवण्यात आलेला आहे.

**ठिकाण :- पनवेल**
**दिनांक :- ०६/०१/२०२२**

**सही/-**
**(गणेश देशमुख)**
**आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

### PANVEL MUNICIPAL CORPORATION
### Public Notice

Maharashtra Municipal Corporation Act, 1949 Section 210
Outward No. PMC/TPD/Roads/26-22/C.R.01/40/2022
Date - 06/01/2022

Whereas, the Director of Town Planning, Maharashtra State in exercise of the powers conferred by section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 vide Notification No.DP-Panvel (R)/TPV-3/16-93/1676, dated 16th march 1993, sanctioned the Panvel Municipal Council's Revised Development Plan and the said Revised Development Plan come into force with effect from 15th May 1993;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State vide Notification No.DP-Panvel (R)/EP/TPV-3/53-94/2820, dated 27th April 1994, sanctioned the Panvel Municipal Council's Revised Development Plan's Excluded Part Development Plan and the said Revised Development Plan's Excluded Part Development Plan come into force with effect from 01th July 1994;

And whereas, Panvel Municipal Council Town Planning Scheme (1st Variation) Final sanctioned by Government dated 31th August 2009;

And whereas, the Government in exercise of the powers conferred by sub section 4 of section 3 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949 vide Notification No. PNP.2914/VIP No.301/C.R. 354/UD-23, dated 25th September 2016 constituted the Panvel Municipal Corporation for the areas of whole area of Panvel Municipal Council and 29 surrounding revenue villages, which come into force with effect from 1st October 2016;

And whereas, the roads shown in sanctioned development plan of erstwhile Panvel Municipal Council and Sanctioned Town Planning Scheme of Panvel town are narrow in consideration with existing heavy traffic and growing population of city, and needs to be widened;

And whereas, the existing 15.24 m wide road aligning from Pancharatna Circle to Ch. Shivaji Maharaj Chouk is decided to be widened to 18.24 m by Hon. Standing Committee, Panvel Municipal Council in exercise of the powers conferred by section 210 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949 vide Resolution No.231, dated 6th March 2020;

Therefore, in accordance with Section 210 of the Maharashtra Municipal Corporation Act, 1949, the following road widening has been proposed and it is kept open for the inspection of the public on all working days and in working hours in the office the of the Assistant Director of Town Planning, Panvel Municipal Corporation;

| Sr. no. | Road Name | Existing Road Width | Proposed Road Width |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1. | Pancharatna Circle to Ch. Shivaji Maharaj Chouk | 15.24 m | 18.24 m (60 Feet) |

Any citizen, who want to submit any objection and/or suggestion about the proposed alignment of the road, he/ she may submit in writing within 30 days from the publication of this notice in Maharashtra Government, Gazette. It shall be noted that, suggestion or objection if any, received by Panvel Municipal Corporation in writing within 30 days from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette would only be considered. The suggestion/objection received after 30 days would not be considered.

Place :- Panvel
Date :- 06/01/2022

Sd/-
(Ganesh Deshmukh)
Commissioner
Panvel Municipal Corporation

**Schedule - A**

**Description of Road**

Road widening of the existing 15.24 m wide road aligning from Pancharatna Circle to Ch. Shivaji Maharaj Chouk is proposed to be widened to 18.24 m under section 210 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949.

Details of Final Plot Numbers of lands affected by the proposed road widening are as below.

| Sr. no. | Name of Village | Final Plot Numbers |
|---|---|---|
| 1. | Panvel | 221, 222, 208 B, 208 A, 223, 224 A, 206, 205 227, 228, 229 A, 229 B, 238, 239/1, 239/2, 240, 241, 198 A, 198 B |

**Note :-** Other than above listed final plot numbers, if any other final plot numbers existed while laying out the road widening then it will also be the part of the above proposed road widening.

**Schedule - B**

Plan showing proposed road widening alignment is kept open for Inspection in the office of the Assistant Director of Town Planning, Panvel Municipal Corporation.

Place :- Panvel
Date :- 06/01/2022

Sd/-
(Ganesh Deshmukh)
Commissioner
Panvel Municipal Corporation

## निवडक

### कर्नाळा खिंडीत अपघात; एक जखमी

**पनवेल :** मुंबई-गोवा महामार्गावर पनवेलजवळील कर्नाळा खिंड येथील पक्षी अभयारण्याच्या समोर असलेल्या गतिरोधकाजवळ स्कुटीवरील चालकाने त्याच्या पुढे चाललेल्या गाडीला पाठीमागून ठोकर दिली. झालेल्या अपघातात स्कुटीवरील एक व्यक्ती जखमी झाला असून या अपघातात दोन्ही गाड्यांचे नुकसान झाले आहे. सौरभ भोजनी (वय २०) हा त्याच्या ताब्यातील स्कुटी घेऊन जात असताना त्याने त्याच्या पुढे जाणाऱ्या वॅगेनर गाडीस पाठीमागून ठोकर मारली. या अपघातात स्कुटीवर पाठीमागे बसलेले ज्ञानेश्वर पाटील (वय ४५) यांच्या डोक्यास गंभीर दुखापत होऊन ते जखमी झाले. या अपघाताची नोंद तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### बारमधून तीन मोबाइलची चोरी

**पनवेल :** आसूडगाव परिसरातील एका बारमध्ये काम करणारे कर्मचारी तेथील रूममध्ये झोपले असताना तेथे आलेल्या एका व्यक्तीने त्या रूममधील तीन मोबाइल चोरी केले. आसूडगाव सेक्टर-४ येथील बारमध्ये काम करणारे कर्मचारी अरुण पासवान व त्यांचे दोन मित्र तेथील एका रूममध्ये झोपले होते. या वेळी त्यांचा सहकारी हृतिक सिंग याचा भाऊ अमितकुमार सिंग याने त्याला भेटण्याचा बहाणा करून रूममध्ये प्रवेश केला व तेथील तीन मोबाइल फोन चोरून तो पसार झाला आहे. याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पुस्तक प्रकाशन व सत्कार समारंभ

**उरण :** मयूरी प्रकाशन व संस्कार भारती यांच्या विद्यमाने 'मराठी काव्य-दर्शन आणि माझे अध्ययन' या वसंत पाटील यांच्या चौदाव्या पुस्तकाचे प्रकाशन आणि चिरनेर गावचे 'आपला काव्यसंग्रह' प्रकाशित करणारे कवी, सेवानिवृत्त सैनिक, शाहीर, वारकरी यांचा सत्कार समारंभ सोहळा मंगळवारी (दि. ११) होत आहे. पनवेलच्या के. गो. लिमये ग्रंथालयात दुपारी ३ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान लक्ष्मणराव टोपले भूषविणार आहेत. कवी अे. के. शेख, दिलीप पांढरपट्टे, उदय टिलक, मधुकर वाडू, नितीन पोवळे, विनोद इंदुलकर, एकनाथ पाटील, वैशाली कुलकर्णी, डॉ. समिधा गांधी, अविनाश म्हात्रे, शारदा पाटील, सुदाम पवार आदी उपस्थित राहणार आहेत.

# पनवेलमध्येही प्रिकॉशन डोस मोहीम सुरू

## महापालिका केंद्रांवर पहिल्याच दिवशी ४५५ जणांनी केले लसीकरण

**पनवेल : प्रतिनिधी**

वाढत्या कोरोना रुग्ण संख्येच्या पार्श्वभूमीवर सोमवार (दि. १०)पासून दुसरा डोस घेऊन नऊ महिने किंवा ३९ आठवडे पूर्ण झालेल्या आरोग्यकर्मी (हेल्थ वर्कर), पहिल्या फळीतील कोरोना योध्दे (फ्रन्ट लाईन वर्कर) तसेच व्याधीग्रस्त (कोमॉर्बिड) असणारे ६० वर्षांवरील नागरिकांना पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सहा शासकीय लसीकरण केंद्रावरती प्रिकॉशन डोस देण्यास सुरूवात झाली. एकुण ४५५ जणांचे लसीकरण सोमवारी करण्यात आले.

टाटा हॉस्पीटल, खारघर येथील शासकीय लसीकरण केंद्रास आयुक्त गणेश देशमुख यांनी भेट देऊन लसीकरण व्यवस्थापनाचा आढावा घेतला. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवरती जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन महापौर डॉ. कविता चौतमोल व आयुक्तांनी केले आहे. या वेळी मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, टाटा हॉस्पीटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रशांत भट, तसेच रूग्णालयाचा स्टाफ उपस्थित होता.



या लसीकरणात पनवेल महापालिकेच्या सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील परिचारिका, डॉक्टरांनी आणि उपजिल्हा रूग्णालयातील परिचारिका, डॉक्टरांनी प्रिकॉशन डोस घेतले. तसेच कोरोना योद्ध्यांमध्ये महापालिकेचे कर्मचारी, पोलीस विभागातील कर्मचारी, महसूल विभागातील कर्मचारी तसेच तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी प्रिकॉशन डोस घेतले. तसेच व्याधीग्रस्त ज्येष्ठांनीदेखील विविध शासकिय लसीकरण केंद्रावरती लसीकरण केले. पनवेल महानगरपालिकेतर्फे टाटा हॉस्पिटल खारघर, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र खारघर, कर्नाटक संघ हॉल नवीन पनवेल, काळभैरव मंगल कार्यालय कळंबोली, सुषमा पाटील हायस्कूल कामोठे, काळण समाज हॉल पनवेल ही सहा केंद्रे सुरू करण्यात आली आहे.

दरम्यान, पॉझिटिव्ह आलेल्या नागरिकांना क्वारंटाईन करण्यासाठी इंडिया बुल्स येथे क्वारंटाईन सेंटर सुरू करण्यात आले आहे. या सेंटरमधील सेवा-सुविधांची आयुक्त देशमुखांनी पाहाणी केली, तसेच वॉर रूमला भेट देऊन तेथील कामाकाजाचा आढावा घेतला.

# गव्हाण विद्यालयात विद्यार्थ्यांच्या कोरोना प्रतिबंधक लसीकरणास गती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये कोविड प्रतिबंधक लसीकरणास वेग प्राप्त झाला आहे. इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचे लसीकरण झाल्यानंतर इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांचे लसीकरणही गतीने होत आहे.



राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत आरोग्य विभागाच्या वतीने होत असलेल्या लसीकरण मोहिमेस विद्यार्थ्यांचा व पालकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून यासाठी प्राचार्या साधना डोईफोडे यांनी अत्यंत नियोजनपूर्वक कार्यवाही केल्यामुळे लसीकरणास गती प्राप्त झाली आहे. विद्यार्थ्यांना कोवॅक्सिन लस देण्यात येत असल्याची माहिती राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाच्या आरोग्य अधिकारी डॉ. आरती गुप्ते यांनी दिली.

या लसीकरण मोहिमेच्या वेळी प्राचार्या साधना डोईफोडे, आरोग्य अधिकारी डॉ. आरती गुप्ते, 'रयत'चे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य, तसेच रयत को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक प्रमोद कोळी यांच्यासह उपप्राचार्य जगन्नाथ जाधव, पर्यवेक्षक दीपक भर्णुके, आरोग्य सहाय्यक सुलभा खाडे व रंजना गायकवाड, तसेच आरोग्य मदतनीस हिरकण्या कोळी, डेटा ऑपरेटर हर्षल पवार व जगदिश कदम, परीक्षा विभाग प्रमुख चित्रलेखा पाटील, शिक्षक पालक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे, संगीत विभाग प्रमुख सुनील गावंड, आरोग्य विभाग प्रमुख एकनाथ ठाकूर व प्रा. राजेंद्र चौधरी व विभाग प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर आदी उपस्थित होते.

लसीकरण मोहीम अधिक गतिमान व यशस्वी करण्यासाठी क्रीडाप्रमुख जयराम ठाकूर, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर व सर्व वर्ग शिक्षक विशेष परिश्रम घेत आहेत.

# खारघरमधील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विश्व हिंदी दिन साजरा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील कर्मचारी कल्याण विभागाच्या वतीने विश्व हिंदी दिवसानिमित्त सोमवारी (दि. १०) व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमास जे. एस. एम महाविद्यालयाचे हिंदी विषयाचे प्राध्यापक कॅप्टन डॉ. मोहसिंग खान यांनी विद्यार्थ्यांना हिंदी भाषेचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय मराठे, आयक्यूएसीचे समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे व इतर प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



महाविद्यालयाच्या कर्मचारी कल्याण विभागाच्या प्रा. करिश्मा पाटील यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रा. प्रियंका पांडे यांनी स्वागत व कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले आणि प्रा. करिश्मा पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले, तसेच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी प्रा. सुकन्या ठोबरे, प्रा. सफिना मुकादम, प्रा. रेवान शिंदे यांनी सहकार्य केले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले.

# डॉ. रवींद्र शिसवेंची केंद्रात नियुक्ती



**नवी मुंबई :** पुणे शहर पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांना केंद्रात महानिरीक्षकपदी (आईजी) आणि सहसचिवपदी पदोन्नती देण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने मान्यता दिली आहे. भारतीय पोलीस सेवेत असणाऱ्या खुप कमी अधिकाऱ्यांना हा बहुमान मिळतो.

शिसवे यांची केंद्र शासनाच्या अखत्यारितील आईजी तथा आईजी समकक्ष पदावर (केंद्रातील सहसचिव) नियुक्ती होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. भारतीय पोलीस सेवेतील २३ जणांना यंदा बहुमान मिळाला आहे. त्यात डॉ. शिसवे हे महाराष्ट्रातील एकमेव अधिकारी आहेत. यापूर्वी त्यांनी गडचिरोली, गोंदिया, सिंधुदुर्ग, बुलढाणा आणि सांगली जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक म्हणून काम केले आहे. डॉ. शिसवे हे मूळचे ठाणे जिल्ह्यातील कल्याणजवळच्या आपटी गावचे रहिवासी आहेत.



**पनवेल : डॉ. सुधीर कटेकर यांच्या वाढदिवसानिमित्त भंगारपाडा (रामनगर) येथे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. सुधीर कटेकर यांना मानद डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल या वेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास भाजपचे वडघर विभागीय अध्यक्ष मच्छींद्र कटेकर, संजय भगत, समीर कटेकर, रोशन दमडेमी, सतीश कटेकर, सुरज दमडे, प्रकाश कटेकर, कुंदन दमडे आदी उपस्थित होते.**

# वावंजेत भाजपतर्फे विविध सामाजिक उपक्रम

## तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वावंजे ग्रुप ग्रामपंचायतीचे सदस्य आणि भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष नासीर नुरमोहम्मद शेख यांचा वाढदिवस सोमवारी (दि. १०) सामाजिक उपक्रम राबवून साजरा झाला. त्यानिमित्त रक्तदान आणि आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांची प्रमुख उपस्थिती लाभली असून त्यांनी रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. दरम्यान, या वेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य एकनाथ देशेकर नववर्षाच्या दिनदर्शिकेचेही प्रकाशन अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.





नासीर शेख यांनी वाढदिवसानिमित्त वावंजे येथे हेल्पिंग हैड्स ट्रस्ट व एमजीएम हॉस्पिटल यांच्या वतीने व अल्पसंख्याक मोर्चा रायगडच्या सहकार्याने रक्तदान शिबिर तसेच आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ परिसरातील अनेक नागरिकांना लाभ घेतला, तसेच भाजप नेते एकनाथ देशेकर यांनी नववर्षाच्या प्रकाशित केलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रमाला भाजप नेते एकनाथ देशेकर, पनवेल पंचायत समितीचे सदस्य भुपेंद्र पाटील, वावंजे पंचायत समिती अध्यक्ष प्रकाश खैरे, रायगड जिल्हा सोशल मिडीया सदस्य अंकूश पाटील, उल्लास पाटील, सचिन पाटील, नदिम शेख, कान्हा फडके, वसंत पाटील, अरुण थळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आदी उपस्थित होते. या वेळी अरुणशेठ भगत यांनी नासीर शेख यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# कामोठ्यात होणार छत्रपती शिवरायांचे भव्य स्मारक

## सर्वपक्षीय बैठकीत ठराव मंजूर

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठेमधील सेक्टर ३५ मायाक्का मंदिर येथे सर्व शिवभक्तांनी गुरुवारी (दि. ६) एका बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीमध्ये कामोठे शहरामधील सर्व पक्षीय नगरसेवक, सर्व राजकीय पक्षाचे, सामाजिक संघटनाचे, मंडळाचे अध्यक्ष तसेच नेते मंडळीना आमंत्रित करण्यात आले होते. या बैठकीमध्ये सर्वांनुमते कामोठे शहरामध्ये मोकळ्या भूखंडावर छत्रपती शिवाजी महाराजाचे भव्य स्मारक व्हावे, असा ठराव सर्वांच्या संमतीने मंजूर करण्यात आला.



कामोठ्यामध्ये एक शहर एक शोभायात्रा या नावाने सर्व मंडळ एकत्र येऊन दरवर्षी हजारोच्या संख्येने शोभा यात्रेचे आयोजन करण्यात येते. ही शोभायात्रा रायगड जिल्ह्यातील सर्वांत मोठी शोभायात्रा असते आणि या शोभायात्रेचा आदर्श हा संपूर्ण महाराष्ट्र घेत असतो. कामोठेची लोकसंख्या ही तीन लाखांच्या घरात पोहचली आहे आणि दिवसेंदिवस ही लोकसंख्या वाढत आहे.

या बैठकीत विविध पक्षाच्या नगरसेवक तसेच पदाधिकाऱ्यांनी मते मांडले आणि सर्वांनुमते छत्रपती शिवाजी महाराजाच्या आश्वरुढ स्मारक तसेच हिंदू समाजाचे प्रतीक असणाऱ्या महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या भगव्या ध्वजाचा ठराव सर्वांनुमते मंजूर करण्यात आला. लवकरच या स्मारकासाठी कामोठ्यामध्ये स्वाक्षरी मोहीम घेण्यात येणार आहे. या समारकासाठी जागा सुचवण्यात आली असून मुंबई-पुणे एक्सप्रेसवरून हे स्मारक दिसावे, अशी मागणी सर्व शिवभक्तांनी केली.

कामोठेमधील सर्व नगरसेवक ही मागणी पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे पत्राद्वारे करणार आहेत आणि येत्या महासभेत हा ठराव मांडून मंजूर करून घेण्यात येईल, अशी ग्वाही कामोठेमधील सर्व नगरसेवकांनी शिवभक्तांना दिली.


# विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन

## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील करिअर आणि मार्गदर्शन केंद्राच्या वतीने 'करिअर मार्गदर्शन'वर ऑनलाइन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमास सीकेटी महाविद्यालयाचे इंग्रजी विषयाचे प्राध्यापक सुर्यकांत परकाळे हे प्रमुख व्यक्ते म्हणून उपस्थित होते. या व्याख्यानामध्ये प्रा. सुर्यकांत परकाळे यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. या वेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय मराठे आयक्यूएसीचे समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे व इतर प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




महाविद्यालयाच्या करिअर आणि मार्गदर्शन केंद्राचे प्रमुख प्रा. महादेव चव्हाण यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रियंका पांडे यांनी केले, तसेच आभार व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिध्देश्वर गडदे यांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले.

# राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणत्या सरकारी तेल कंपनीचे बाजारमूल्य सर्वांत अधिक आहे?**
***अ.)*** इंडियन ऑईल ***ब.)*** बीपीसीएल ***क.)*** ओएनजीसी ***ड.)*** एचपीसीएल

**२. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक असलेल्या डीमॅट खात्यांची संख्या भारतात सध्या एवढी झाली आहे.**
***अ.)*** ४.३ कोटी ***ब.)*** ५.५ कोटी ***क.)*** १० कोटी ***ड.)*** ७.४ कोटी

**३. अप्रत्यक्ष कर असलेल्या गुड अॅण्ड सर्विस टॅक्स (जीएसटी) ची आतापर्यंतची सर्वाधिक मासिक वसुली एवढी झाली आहे.**
***अ.)*** १.१९ लाख कोटी रुपये ***ब.)*** १.४५ लाख कोटी रुपये
***क.)*** १.३९ लाख कोटी रुपये ***ड.)*** १.१० लाख कोटी रुपये




**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा.**

## संपादकीय

# शाळांवर संकट

महाराष्ट्र आणि मुंबईतील कोरोना रुग्णांचे वाढते आकडे चक्रावून टाकणारे आहेत. ही वाढती रुग्णसंख्या लक्षात घेऊन राज्यात पुन्हा निर्बंध लागू करण्यात आले. तथापि, हे निर्बंध पूर्वीइतके कडक नाहीत हे लक्षात घेतले पाहिजे. उपाहारगृहे, दुकाने, मॉल, सिनेमागृहे, नाट्यगृहे अशा सर्व ठिकाणी ५० टक्के उपस्थितीस परवानगी देण्यात आली आहे. बाकी सगळे व्यवहार बव्हंशी सुरू असताना शाळा मात्र सरसकट १५ फेब्रुवारीपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय सरकारने घेतला, तो मात्र अनाकलनीय वाटतो. हा निर्णय विद्यार्थ्यांच्या हिताचा नाही असे शिक्षणतज्ज्ञांचेही मत आहे.

**कोरोनाने उभे केलेले आव्हान मोठेच आहे यात शंका नाही. कोरोनाचा सध्या धुमाकूळ घालणारा ओमायक्रॉन हा नवा अवतार जगभरच सर्वांना सळो की पळो करून सोडत आहे. गेल्या दोन वर्षांत कोरोना विषाणूच्या ज्या काही दोन-तीन लाटा आल्या, त्यामध्ये आपल्याकडे सर्वाधिक नुकसान शाळकरी मुलांचे झाले आहे. आताही रुग्णसंख्या वाढू लागताच अन्य काही पर्याय नसल्याप्रमाणे लागलीच सरसकट शाळाबंदीचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे शाळकरी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान तर होणार आहेच, पण शारीरिक व मानसिक नुकसान अधिक मोठे असेल याचा विचार निर्णयकर्त्यांनी केला होता काय असा प्रश्न पडतो. वारंवार शाळा बंद केल्यामुळे विद्यार्थीवर्गाची सर्व बाजूंनी हेळसांड होते. याच विद्यार्थीवर्गाकडे पाहून आपण भविष्यात देशाला महासत्ता बनवण्याची भाषा करतो. याच विद्यार्थीवर्गाला उज्ज्वल भविष्यकाळासाठी तयार करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने नवे कौशल्याधारित शैक्षणिक धोरण जाहीर केले. परिस्थिती सुरळीत असती तर नवे शैक्षणिक धोरण या वर्षीपासूनच लागू होणार होते. देशाच्या बहुतांश भागात कदाचित तसे ते होईलही, परंतु तेव्हा महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी काय करायचे या प्रश्नाचे उत्तर राज्यकर्त्यांना शोधावे लागेल. ज्या ठिकाणी कोरोनाचा कुठलाही प्रादूर्भाव पोहोचलेला नाही अशी ठिकाणे महाराष्ट्रातही आहेत. विशेषत: छोट्या गावांमध्ये किंवा खेड्यांमध्ये अथवा आदिवासी पाड्यांवर कोरोनाचा नवा विषाणू शिरकाव साधू शकलेला नाही. राज्यात जिल्हा परिषदांच्या सुमारे ५० टक्के शाळा दोन शिक्षकी आहेत. यापैकी बहुतेक शाळांची पटसंख्या ५०च्या आत किंवा आसपासच आहे. ग्रामीण भागामध्ये कोरोनाचा जोर तितकासा दिसत नाही ही वस्तुस्थिती आहे. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून सरसकट शाळाबंदीचा निर्णय राज्य सरकारने एकतर मागे घ्यावा किंवा त्यामध्ये थोड्याफार सवलती द्याव्यात. तेच विद्यार्थ्यांच्या हिताचे होईल. सरसकट शाळाबंदीच्या निर्णयाचा फेरविचार करायचा म्हणजे नेमके काय करायचे असा प्रश्न इथे उपस्थित होतो. याचे उत्तर खरे तर कठीण नाही. शाळांबाबत स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन, तसे स्थानिक प्रशासनाला अधिकार देऊन निर्णय घ्यायला हवेत असे मत राज्य मुख्याध्यापक महासंघाने देखील व्यक्त केले आहे. शाळाबंदी हे शिक्षणाचा अधिकार देणाऱ्या कायद्याचे सरळ सरळ उल्लंघन आहे याचे भान राज्य सरकारला नाही. शाळकरी विद्यार्थीवर्गाला स्वत:चा आवाज नसतो. निर्णय प्रक्रियेवर ते दबाव टाकू शकत नाहीत. किंबहुना, त्यांच्या भवितव्याबाबतचे निर्णय त्यांच्या हातात नसतातच. धोरणकर्त्यांनीच विद्यार्थीवर्गाला असे गृहित धरले, तर नुकसानीशिवाय हाती काहीही लागणार नाही ही काळ्या दगडावरील रेघ आहे. विविध पर्याय शोधून प्राप्त परिस्थितीत शाळा सुरू ठेवण्याबाबत सरकारने फेरविचार करावा हेच विद्यार्थ्यांसाठी हिताचे आहे.**

# दासगावच्या मासळी बाजारावरही कोरोनाचे सावट



## खबरबात
**महेश शिंदे**

महाड तालुक्यातील दासगाव येथे भरणाऱ्या सुक्या मासळी बाजाराला गेली अनेक वर्षाची परंपरा आहे. त्यामुळे या परिसरात हा बाजार प्रसिद्ध आहे, मात्र गेली दोन वर्षे कोरोनाच्या प्रादूर्भावामुळे हा बाजार बंद होता. त्यातच आलेला पूर आणि पावसाळा याचा परिणामदेखील सुक्या मासळी विक्रीवर झाला. नुकताच हा बाजार पुन्हा सुरू झाला असतानाच कोरोनाने पुन्हा डोके वर काढले. याचा परिणाम या मासळी बाजारावर जाणवू लागला आहे. त्यातच सुक्या मासळीचे दरदेखील गगनाला भिडले असल्याने सर्वसामान्य नागरिकांसह घाऊक व्यापारीदेखील हबकले आहेत.

दासगाव हे आजही एक मोक्याचे बंदर आहे. पूर्वी महाड बंदरातील होणाऱ्या व्यापारामुळे दासगाव बंदरदेखील विकसित झाले होते. कालांतराने वाहतुकीची साधने वाढली आणि महाड बंदरातील व्यापार बंद झाला, मात्र दासगाव बंदरात आजही व्यापार सुरू आहे. महाड तालुक्यातील दासगावमधील आठवडा बाजार हा फक्त सुक्या मासळीसाठी प्रसिद्ध आहे. ब्रिटिशकाळात या ठिकाणी बंदर होते. होडीच्या सहाय्याने या ठिकाणी सुकी मासळी आणि इतर मालाची ने-आण होत होती. या परिसरातील महाड खाडीपट्टा ते थेट भोर, खानातून सुकी मासळी नेण्यासाठी या ठिकाणी ग्राहकांची गर्दी असते. दिघी, म्हसळा, श्रीवर्धन आदी ठिकाणाहून सुकी मासळी या ठिकाणी येते. चांगल्या दर्जाची सुकी मासळी दासगावमध्ये मिळत असल्याने या ठिकाणी आजदेखील कायम गर्दी असते. खिशाला परवडेल असा भाव या सुक्या मासळीला असल्याने मोठ्या प्रमाणात या ठिकाणी खरेदीला गर्दी असते. पुणे, मुंबईमधून सुक्या मासळीचे हौशी येथे येत असतात, मात्र गेल्या दोन वर्षापासून या ठिकाणी सुक्या मासळीच्या बाजारावर कोरोनाचे सावट दिसू लागले आहे. त्यातच सुक्या मासळीचे दर प्रतिवर्षाला चढत गेल्याने सर्वसामान्य माणूस या बाजारापासून दूर जात आहे.

गेल्या आठवडाभरापासून कोरोनाने पुन्हा डोके वर काढले आहे. दासगाव परिसरात कोरोनाचे रुग्ण अद्याप जरी नसले, तरी कोरोनाच्या पहिल्या लाटेत हा परिसर चांगलाच हबकला होता. सद्यस्थितीत महाड तालुक्यात १००च्या आसपास कोरोना रुग्ण आढळून आले आहेत. परिणामी रायगड जिल्ह्यात घातलेल्या निर्बंधांमुळे महाड तालुक्यातदेखील भीतीचे वातावरण तयार झाले आहे. त्यामुळे दासगावमध्ये दर शनिवारी भरवल्या जाणाऱ्या सुक्या मासळीच्या बाजारावर कोरोनाचे सावट पसरले आहे.

दासगावच्या आठवडा बाजारात सोडा आजही चक्क ११०० रुपये, सुके बोंबील ६०० रुपये, अंबाडी सुकट ४०० रुपये, कोलीम, वाकटी, मासे सुकट आदींचे दरदेखील पूर्वीपेक्षा दुप्पट झाले आहेत. त्यामुळे ग्राहक नाराज होऊन जेवढे घेता येईल तेवढेच घेऊन पाठ फिरवत आहेत. या बाजारावर घाऊक व्यापाऱ्यांची नजर असल्याने ते या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खरेदी करतात. सुकी मासळी हे गोरगरीब आणि कष्टकऱ्यांचे अन्न समजले जायचे, मात्र या मासळीचा गंध आणि चव पाहता भले भले उच्चभ्रू लोकदेखील या सुक्या मासळीच्या प्रेमात पडले आहेत.

मुरूड, हार्णे, श्रीवर्धन या पट्ट्यात समुद्र किनारी ही मासळी वाळवून सुकी मच्छी तयार केली जाते, मात्र त्या ठिकाणची हवा दमट असल्याने ही मासळी या ठिकाणी जास्त काळ ठेवता येत नाही. कोरडे आणि शुष्क वातावरण असलेल्या महाडमध्ये या मासळीचा साठा केला जातो. त्यामुळे पूर्वापारपासून महाड आणि दासगाव परिसरात सुक्या मासळीची मोठ्या प्रमाणात विक्री होत असते. महाड आणि दासगावमधून ही सुकी मासळी समुद्रापार परदेशातही जाते, मात्र कोरोनाचे सावट पुन्हा एकदा गडद झाले असून दासगावमधील या सुक्या मासळीच्या बाजारावर संकट आले आहे. या आठवडा बाजाराला स्थानिक ग्रामपंचायत आणि शासनाकडून संरक्षण आणि सुविधा मिळणे गरजेचे आहे, तरच भविष्यात हा आठवडा बाजार टिकून राहू शकतो.

# ‘आदर्श’च्या रक्तदान शिबिरास प्रतिसाद



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील आदर्श पतसंस्थेच्या श्रीबाग शाखा तृतीय वर्धापन दिन कोरोनाचे नियमांचे पालन करून साजरा करण्यात आला. सामाजिक बांधिलकी म्हणून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यास चांगला प्रतिसाद मिळाला असून जमा झालेल्या १०१ रक्ताच्या बाटल्या अलिबाग येथील जिल्हा ब्लड बँकेत जमा करण्यात आल्या.

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक अभिजित पाटील यांनी रक्तदान करून शिबिराची सुरुवात झाली. या वेळी आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश पाटील, उपाध्यक्ष सतीश प्रधान, संचालक जगदीश पाटील, अभिजित पाटील, सिइओ मीनाक्षी पाटील, ब्लड बँकेचे डॉ. दीपक गोसावी, आदर्श पतसंस्थेचे शाखा सल्लागार विजय पाटील, ब्लड बँकेचे कर्मचारी, आदर्श पतसंस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

आदर्श पतसंस्था दरवर्षी वर्षातून दोन वेळा रक्तदान शिबिराचे आयोजन करत असते. या शिबिरातून संकलन झालेल्या रक्तदानाचे कार्ड आदर्शमध्ये उपलब्ध असतात. याचा लाभ बऱ्याच गरजू रुग्णांनी घेतला आहे.

# नाशिक-खोपोली महामार्ग अर्धवट तरीही टोलनाका बनविण्याची तयारी

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातून जाणाऱ्या शहापूर-मुरबाड-कर्जत-खोपोली या नवीन राष्ट्रीय महामार्गाचे कर्जत तालुक्यात रुंदीकरण व आरसीसी काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे, मात्र हे काम अर्धवट असूनसद्धा टोलनाके उभारण्याचा घाट घालण्यात आला आहे. दरम्यान, आधी रस्ता पूर्ण करा आणि नंतरच टोलनाके उभारा, अशी मागणी मनसेच्या वतीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा (एमएसआरडीसी)कडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



(छाया : संतोष पेरणे)

शहापूर-मुरबाड-कर्जत-खोपोली या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८अ चे रुंदीकरण व आरसीसी काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. हा महामार्ग कर्जत तालुक्यातून (५२ किलोमीटर) पुढे खोपोली-पाली मार्गे वाकण येथे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाला जाऊन मिळतो. कर्जत तालुक्यातील कळंब येथे दोन ठिकाणी या महामार्गाचे काम अर्धवट आहे. पुढे सुगवे गावाजवळील चिल्लार नदी पुलाच्या दोन्ही बाजूला हा महामार्ग अर्धवट स्थितीत आहे. नांगुर्ले गावांजवळही महामार्गाचे काम झालेले नाही, तर पळसदरीपासून पुढे महामार्गाच्या एका लेनचे काम झालेले नाही. खालापूर तालुक्यातील मानकिवली ते हाळ फाट्यापर्यंतदेखील काँक्रीटीकरण झालेले नाही. या महामार्गाच्या काँक्रीटीकरणाचे काम जागोजागी अर्धवट असतानाही एमएसआरडीसीने पळसदरी येथे टोलनाका उभारण्याचे काम सुरू केले आहे. तसेच कर्जत तालुक्यातील भागूचीवाडी उताराजवळदेखील टोलनाका उभारण्याच्या हालचाली सुरू आहेत. ही कर्जत तालुक्यातील वाहनांवर अन्याय करणारी बाब आहे.

दरम्यान, या महामार्गाचे काम पूर्ण होत नाही तोवर कुठेही टोलनाके सुरू करू नका, अशी मागणी करणारे निवेदन मनसेच्या वतीने एमएसआरडीसीच्या पनवेल येथील कार्यालयात देण्यात आले.

**“ शहापूर-खोपोली या राष्ट्रीय महामार्गाचा कर्जत, खालापूर तालुक्यातील रस्ता अद्याप अर्धवट अवस्थेत आहे, असे असतानादेखील राज्य रस्ते विकास महामंडळाने टोलनाके बांधले तर आम्ही टोलनाके फोडून टाकू.**

**-जितेंद्र पाटील, जिल्हाध्यक्ष, मनसे, रायगड**

# ‘महाड नगरपालिका निवडणुकीत भाजप सर्व जागा लढविणार’

**महाड : प्रतिनिधी**

होऊ घातलेल्या महाड नगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्ष सर्वच्या सर्व जागा लढवून यांतील निम्मा जागांवर विजय मिळवेल, असा विश्वास जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर यांनी भाजपच्या चर्चासत्र बैठकीमध्ये व्यक्त केला.

महाड नगरपालिका निवडणुकीसाठी महाड भाजपच्या वतीने पक्षातील सर्व जेष्ठ, श्रेष्ठ, जुन्या नवीन पदाधिकारी व कार्यकर्त्यांना एकत्रित आणून एक चर्चासत्र बैठक शुक्रवारी (दि. ७) ब्राह्मण सभागृह येथे घेण्यात आली. कोरोनाचे सर्व नियम पाळून शहर अध्यक्ष निलेश तळवटकर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी मनसेचे महेश शेडगे यांनी भाजपात जाहीर प्रवेश केला, तसेच निलेश तळवटकर यांच्या अध्यक्षतेखाली महाड शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. तुर्क येथील वेटलिफ्टींग स्पर्धेत भारताला रजक पदक मिळवून देणारी सलोनी पद्माकर मोरे व १०० मिटर रनिंग मध्ये यश मिळविलेल्या सलोनी राहुल लाड यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा ताफा अडविल्याप्रकरणी काँग्रेसचा निषेधाचा ठराव करण्यात आला.

या वेळी तालुका अध्यक्ष जयवंत दळवी, गणेश परांजपे, शेखर ताडफळे, शहर अध्यक्ष निलेश तळवटकर, डॉ. अजय जोगळेकर, अक्षय ताडफळे, सुधीर महाडीक, संदीप ठोंबरे, डॉ. मंजुशा कुद्रीमोती, डॉ. अजय जोगळेकर आदी पदाधिकारी उपस्थित होते. यातील अनेकांनी आपली मते या वेळी मांडली.



# कर्जतमधील वाहतूक कोंडीची समस्या सुटणार कधी?

**कर्जत : बातमीदार**

शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यात प्रशासनाला यश येत नाही. या वाहतूक कोंडीमुळे कर्जत बाजारपेठेतील व्यापारी व नागरिक हैराण झाले आहेत. पोलीस आणि नगरपालिका यांच्याकडून या वाहतूक कोंडीवर काही उपाय शोधले जात नसल्याने नागरिकांमध्ये संताप आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून कर्जत शहरामध्ये वाहतूक कोंडीची समस्या आहे, मात्र ही समस्या सोडविण्यास स्थानिक प्रशासन कुचकामी ठरले असून यावर उपाय योजना करण्याऐवजी वाहतूक हटविणे ही आमची जबाबदारी नसल्याचे कर्जत नगर परिषद आणि पोलीस प्रशासन हे वाहतूक कोंडीची जबाबदारी एकमेकांवर ढकलत आहेत. त्यामुळे ही जबाबदारी कोणाची असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. नगर परिषदेकडून सिमेंट काँक्रिटचे रस्ते केले जात आहेत, मात्र या रस्त्यांवर कोणी कुठेही गाड्या उभ्या करीत आहेत. त्यामुळे हे रस्ते पादचाऱ्यांसाठी आहेत की गाड्या उभ्या करण्यासाठी, असा प्रश्न नागरिकांना पडत आहे.

कर्जत शहरातील आमराई रोड, महावीर पेठ, मुख्य बाजारपेठ, डेक्कन जिमखाना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकापासून ते नगर परिषद, विठ्ठलनगर येथील प्रसाद झेरॉक्सपासून ते अभिनव ज्ञान मंदिर स्कूल, सुरभी ज्वेलर्सपासून ते समर्थ इलेक्ट्रिक या दुकानापर्यंत रस्त्याच्या दोन्ही दुतर्फा दुचाकी व चारचाकी वाहने उभी केली जात आहेत. त्यामुळे ये-जा, बाजारहाट करताना नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच दुकाने, बँकांसमोर गाड्या लावून मालक तासन्तास गायब असतात.

या संदर्भात ट्रॅफीक हटविणे ही आमची जबाबदारी नसून ती पोलिसांची आहे, असे नगर परिषदेचे अधिकारी सांगतात, तर टोव्हिंग व्हॅन काढून घेताना नगर परिषदेने आम्हाला कळविले नाही, असे उत्तर पोलीस प्रशासनाकडून दिले जात आहे. जर नागरिक वेळेवर सर्व प्रकारचे कर भरून शासनाला सहकार्य करीत आहे, तर नागरिकांना होणारा त्रास दूर करणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे बोलले जात आहे.

# मुलांच्या शाळापूर्व तयारीसाठी जिल्ह्यात पालवी प्रकल्प

**अलिबाग : प्रतिनिधी**

क्रेस्ट ही संस्था तीन ते सहा वर्ष वयोगटातील मुलांची शाळापूर्व शैक्षणिक तयारी होण्यासाठी पालवी प्रकल्प राबवते. हा प्रकल्प रायगड जिल्ह्यात राबवण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा परिषद व क्रेस्ट संस्था यांच्यामध्ये करारनामा करण्यात आला आहे. जिल्ह्यात हा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यासाठी खालापूर प्रकल्पाची निवड करण्यात आली आहे.

या प्रकल्पाची खालापूरमध्ये सुरुवात म्हणून पालवी प्रकल्पांतर्गत अमरावती जिल्ह्यातील तिवसा प्रकल्प व यवतमाळ येथील नेर प्रकल्प पाहण्यासाठी अभ्यासदौरा आयोजित करण्यात आला. या अभ्यासदौऱ्यात तिवसा व नेर येथील पालवी अंतर्गत अंगणवाड्यांना भेट दिली. याचसोबत तेथील पर्यवेक्षिका व सेविकांशी संवाद साधून पालवी उपक्रम समजून घेतला.

या अभ्यासदौऱ्यात जिल्हा परिषदेचे महिला व बालकल्याण विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितिन मंडलिक, चेतन गायकवाड, आशा खेडेकर, क्रेस्ट संस्थेचे व्यवस्थापक नितीन विशे सहभागी होते. या दौऱ्यात सहभागी सदस्यांना अमरावतीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी कैलास घोडके व यवतमाळचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत थोरात यांनी त्यांचे अनुभव सांगितले.



# किरवली ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चा

## नळपाणी योजना बंद पडल्याने महिला आक्रमक

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील किरवली ग्रामपंचायतीमधील किरवली गावातील नळपाणी योजना जुलै २०२१ पासून बंद आहे. त्यामुळे ग्रामस्थांना पिण्याचे पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. पाणीटंचाईने हैराण झालेल्या गावातील संतप्त महिलांनी जाब विचारण्यासाठी सोमवारी (दि. १०) ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चा काढला होता.

कर्जत शहरापासून अर्ध्या किलोमीटरच्या अंतरावर असलेल्या किरवली ग्रामपंचायतीने १७ वर्षांपूर्वी नदीवरून पाणी उचलून किरवली गावासाठी नळपाणी योजना राबविली होती. या नळपाणी योजनेची उल्हास नदीवर चेडोबा मंदिराच्या मागे असलेली विहीर जुलै २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये कोसळली. त्या वेळी विहिरीच्या बाहेर असलेला वीजपंपदेखील विहिरीत कोसळला होता.


(छाया : संतोष पेरणे)

तेव्हापासून किरवली गावाची नळपाणी योजना बंद आहे. गावात खाजगी बोअरवेल आहेत, त्यांचा फायदा ठरविक ग्रामस्थांना होतो, मात्र निम्म्या ग्रामस्थांना पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागते. त्यामुळे संतप्त झालेल्या किरवली गावातील महिलांनी सोमवारी देऊळवाडी येथे असलेले ग्रामपंचायत कार्यालय गाठले. त्या वेळी २५७ महिलांच्या सह्यांचे निवेदन ग्रामपंचायतीला देण्यात आले.

सरपंच संतोष सांबरी यांनी, नळपाणी योजना कार्यन्वित करण्यासाठी ग्रामपंचायतीकडून करीत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली, तसेच १५ दिवसात नळपाणी योजना सुरू होईल, असे आश्वासन दिले.

**किरवली गावासाठी असलेली सध्याची नळपाणी योजना भरपूर जुनी आहे. त्यात पावसाळ्यात वीजपंप आणि विहिरीचे झालेले नुकसान त्यानंतर तेथील वीजपुरवठा करणारी यंत्रणादेखील निकामी ठरलेली आहे. त्यामुळे त्यातही आम्ही गेले अनेक दिवस दुरुस्तीचे काम करीत असून काही दिवसांत पाणी पोहचेल, मात्र किरवली गावासाठी नवीन नळपाणी योजना असावी यासाठी जल जीवन मिशनमध्ये आम्ही नळपाणी योजना प्रस्तावित केली आहे.**

**–संतोष सांबरी,**
**सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत**
**किरवली, ता. कर्जत**

# नितीन गवारे मुरूडचे नवे पोलीस निरीक्षक

**मुरूड : प्रतिनिधी**



पोलीस निरीक्षक नितीन गवारे यांनी नुकताच मुरूड पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला. त्यांचे तालुका पत्रकार संघाने स्वागत केले.

मुरूड येथे येण्याअगोदर गवार हे महाड येथे कार्यरत होते. मुरुड तालुक्यातील वातावरण शांत ठेवण्याचा माझा प्रयत्न असणार आहे, असे त्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर सांगितले. यावेळी मुरूड तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष सिराज शेख, सचिव सुधीर नाझरे, सहसचिव नितीन शेडगे, खजिनदार गणेश चोडणेकर, माजी अध्यक्ष उदय खोत, सदस्य मेघराज जाधव, संजय करडे आदी उपस्थित होते.


## पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी



### पनवेल महानगरपालिका हद्दीत मंगळवार, दि. ११ जानेवारी २०२२ रोजी होणारे

# कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

### कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
२. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा–उरण नाका, पनवेल
३. आयटीएम कॉलेज, नवीन पनवेल
४. सिडको सामाज मंदिर, से. ५ ई (ना.पा.आ.के.४, कळंबोली)
५. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
८. मनस्मृती रोटरी सेंटर, खारघर
९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
१०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
११. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
१२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
१३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे–मुंबई हायवे)
१४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
१५. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
१६. काळण समाज हॉल, पनवेल

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

*कोव्हॅक्सीन लसीच्या तुटवड्यामुळे कोणत्याही लसीकरण केंद्रावर कोव्हॅक्सीनचे लसीकरण होणार नाही.*

*प्रिकॉशन डोस हे फक्त दुसरा घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या आरोग्यसेवा कर्मचारी, फ्रंटलाईन वर्कर्स आणि ६० वर्षांवरील कोमॉर्बिड व्यक्तींचेच लसीकरण घ्यावी याची नोंद घ्यावी.*


# काशीद समुद्रात बुडणाऱ्या तीन पर्यटकांचे प्राण वाचवले

## जीवरक्षक आणि मुरूड पोलिसांचे प्रसंगावधान

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील काशीद समुद्रात रविवारी (दि. ९) दुपारी बुडत असणाऱ्या तीन पर्यटकांचे प्राण मुरूड पोलीस आणि जीवरक्षकांच्या प्रसंगावधानामुळे वाचले.

पुणे कात्रज परिसरातील पाच पर्यटक रविवारी काशीद समुद्र किनारी आले. त्यातील चार जण दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास समुद्रात पोहण्यास उतरले. यापैकी श्रीकांत ढाके (वय २७), गणेश प्रकाश पाटील (वय २३) व मुरलीधर सोनावणे (वय २८) हे पोहता पोहता समुद्राच्या खोल भागात गेले. त्यांना परत किनारा गाठणे अश्यक्य झाले होते. समुद्रातूनच ते हातवारे करून वाचवण्याची विनंती करीत होते. त्या वेळी तेथे मुरूड पोलीस ठाण्याचे शिपाई प्रशांत प्रभाकर लोहार हे कर्तव्यावर होते. तीन पर्यटक बुडत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने स्पीड बोट चालक संजय जाधव व जीवरक्षक राकेश रक्ते यांच्या निदर्शनास आणून सूत्रे हलवली. क्षणांचाही विलंब न लावता स्पीड बोट घटनास्थळी गेली. जीवरक्षक राकेश रक्ते यांनी पाण्यात उडी मारून बुडणाऱ्या तिघांना बोटीत चढवले व तातडीने किनारा गाठला. त्यांना प्रथमोपचार देण्यात आले. हळूहळू ते नॉर्मल झाले व काही मिनिटाच्या अंतराने बोलू लागले.


(छाया : संजय करडे)

कुळगांव बदलापूर नगरपरिषद

जा.क्र. : कुबनप/साबां/२८७/२०२१–२२ दिनांक :– १०/०१/२०२२

**जाहीर ई–निविदा सूचना क्र. २८/२०२१–२२**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजने अंतर्गत प्रस्तावित ०२ कामे करणेसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई–निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई–निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. ११/०१/२०२२ ते दि. ०७/०२/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत आहे व सदर निविदा दि. ०८/०२/२०२२ रोजी दुपारी १२:०० नंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व नगरपरिषदेच्या सूचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सही/–
मुख्याधिकारी तथा
प्रशासक
कुळगांव बदलापूर नगरपरिषद

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतींचे मालक मे. चेरिएट प्रॉपर्टीज एल.एल.पी. तर्फे भागीदार अमित मधु बठीजा यांनी सदरची मिळकत महाराष्ट्र शासन राजपत्र क्रमांक MHBIL/२०१२/४६१२१ दि. १९/०३/२०२१ नुसार २४.०० मी. डी.पी. रोड दिलेली आहे.

सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबत आमच्या अशिलांना हमी व भरवसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचेही खरेदी, विक्री, गहाण, दान, लीज, लोन, साठेखत, कोर्ट हुकूम, वारस हक्क, ताबे वहिवाट अथवा कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार असल्यास याबाबत सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसांच्या आत लेखी व योग्य त्या कागदपत्रासह खात्री करून द्यावी. कार्यालयाचा पत्ता-ऑफिस क्र. ४१३, चौथा मजला, सतरा प्लाझा, पामबिच रोड, वाशी, नवी मुंबई-४००७०५. दिलेल्या मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे व ज्याचा हक्क आहे तो त्याने जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल सदरचा व्यावहार पूर्ण करतील तद्नंतर कोणतीही तक्रार चालणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
मौजे गाव घोट, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड येथील

| क्र. | सर्व्हे क्रमांक | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १ | ३३ | १९५० |
| २ | ६१ | ३६०० |
| ३ | ६२/१ | ७७५ |
| | एकुण क्षेत्र | ६३२५ |

दिनांक : ११/०१/२०२२ सही/-
ठिकाण : नवी मुंबई ॲड. योगेश पंजवाणी



# कापडे येथे कोविड–१९ लसीकरण

**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड शिक्षण प्रसारक मंडळाच्या कापडे बुद्रुक (ता. पोलादपूर) येथील श्री वरदायिनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात १५ ते १८ वर्ष वयोगटातील बालकांना कोविड–१९ लसीकरण शुभारंभ मंडळाचे अध्यक्ष हनुमंत जगताप यांच्या हस्ते करण्यात आला.

रायगड जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे, सुमन कुंभार, विद्यालयाचे अध्यक्ष सी. दौ. सकपाळ, संस्थेचे सहकार्यवाह महेंद्र पाटेकर, विश्वस्त संजय मेहता, पोलादपूर पंचायत समितीचे उपसभापती शैलेश सलागरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. गुलाबराव सोनावणे, गटविकास अधिकारी धनंजय जगताप, प्राचार्य रविकांत सकपाळ, अजय सलागरे, रामदास सकपाळ, संतोष सकपाळ यांच्यासह शिक्षक व कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## Extension to E –TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000021806** **Tender No. : EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-60/2021-2022.** Extension to RFx e-tender for work of construction of 1 No. of 22kV Tupgaon Feeder at 100kV Bhokarpada substation under EHV(O&M)Dn.Panvel. **Tender amount Rs. 5,97,525/-, EMD amount Rs. 5,975/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **10.01.2022, 17:00 Hrs. to 17.01.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 17.01.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **18.01.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(Amol Waghamare)**
**EXECUTIVE ENGINEER(I/C)**
**EHV(O&M) DN PANVEL**

महाराष्ट्र शासन
**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**संक्षिप्त ई-निविदा सूचना क्र. ३९ सन २०२१-२२**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | भिवंडी तालुक्यातील रा.मा. ८१ ते जांभिवली जोड रस्ता ग्रामा ७६ रस्ता तयार करणे. जि. ठाणे | २२,१०,३५९/– |
| २ | कोपरी, ठाणे (पु) येथील शासकीय तांत्रिक विद्यालय, ठाणे या संस्थेच्या प्रशासकीय इमारतीच्या छतावर प्रिकोटेड शिटचे शेड बांधणे. | २६,५१,४००/– |
| ३ | भिवंडी तालुक्यातील भगिनी निवेदिता उत्कर्ष मंडळ अनगाव येथे बहुउद्देशीय सभागृहाचे बांधकाम करणे. | १७,८३,९४५/– |

**डाऊनलोड करण्याचा कालावधी दिनांक १४/१/२०२२ ते दिनांक २८/१/२०२२ वेळ १०.३० ते १७.३०**
**ई–निविदा उघडण्याचा दिनांक ३१/१/२०२२ वेळ १५.०१ ते १७.३० (शक्य झाल्यास)** सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई–निविदा प्रणालीच्या https//mahatenders.gov.in या पोर्टलवर portal वर enrolled करणे आवश्यक आहे.

**जा.क्र. ठावि/निविदा/२०८**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग क्र. १ ठाणे**
**दिनांक – १०/०१/२०२२**

सही/–
कार्यकारी अभियंता,
सा.बां. विभाग क्र. १, ठाणे

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता | करारनामा/ वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा/भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार करारनामा/ वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | | | | | |
| १ | उलवे १८०७ | गव्हाण २१२ | १८/१ ३५२/५ | ०–०५–६ ०–०१–६ ०–०८–१ ०–०१–५ | १५० चौ.मी. प्रस्तावित | भूखंड क्र. C–१६, सेक्टर–८, क्षेत्र १५० चौ.मी. | १) श्रीमती वासंती लक्ष्मण कोळी २) श्री. नरेश लक्ष्मण कोळी ३) श्री. जीवन लक्ष्मण कोळी ४) कुमारी अरुणा लक्ष्मण कोळी ५) कुमारी पिंकी लक्ष्मण कोळी | |
| | | | **एकुण** | **०–१६–८** | | | | |
| **नोड- द्रोणागीरी** | | | | | | | | |
| २ | १३८४ + १३९५ + १४०४ | भेंडखळ ६८/ ८५–८६ | २२९/२ २२९/८ | ०–२०–४ | २०० चौ.मी. | द्रोणागीरी भूखंड क्र. ९७ सी, सेक्टर–५३, क्षेत्र–१९९.९५ चौ.मी. | **भूधारक १. कै. लक्ष्मीबाई कोंडु म्हात्रे (मयत), यांचे वारस –** १) कै. सुरेश कोंडु म्हात्रे (मयत) १.१) श्रीमती लिला सुरेश म्हात्रे १.२) श्री. राजेश सुरेश म्हात्रे ३ ) श्रीमती वत्सला शंकर म्हात्रे ४) श्री. हेमंत शंकर म्हात्रे ५) श्रीमती हेमलमा रमेश पाटील ऊर्फ श्रीमती हेमलता कोंडु म्हात्रे | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :– **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र.१०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३८०/२०२१-२२



# आजपासून भारत-आफ्रिका निर्णायक कसोटी

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तिसरी कसोटी ११ जानेवारीपासून केपटाऊनमध्ये सुरू होणार आहे. या मालिकेत आतापर्यंत दोन सामने झाले असून उभय संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला आहे. त्यामुळे तिसरी व शेवटची कसोटी निर्णायक ठरणार आहे.

भारतीय संघ दोन दिवस अगोदरच केपटाऊनमध्ये दाखल झाला असून सरावालाही सुरुवात केली आहे. तिसऱ्या कसोटीपूर्वी टीम इंडियासाठी आनंदाची बातमी आली आहे. नियमित कसोटी कर्णधार विराट कोहली संघात पुनरागमन करणार आहे. पाठीच्या वरच्या भागात दुखापत झाल्यामुळे कोहलीला दुसऱ्या कसोटीतून बाहेर पडावे लागले होते.

टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनीही कोहली तिसऱ्या कसोटीत पुनरागमन करेल, असे संकेत दिले आहेत. द्रविड यांनी व्हर्चुअल पत्रकार परिषदेत सांगितले की, विराट कोहली पूर्णपणे ठीक झाल्याचे दिसत आहे, तर कर्णधार विराट कोहलीने मोहम्मद सिराजच्या दुखापतीबाबतही अपडेट दिले. त्याने सांगितले, सिराज फिट नाही. आम्ही त्याच्या जागी संघात कोणाचा समावेश करायचा हे ठरवू. आमच्याकडे बरेच पर्याय आहेत.

# महाडमध्ये महिला क्रिकेट स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**महाड : प्रतिनिधी**

वेदा जनजागृती मंचतर्फे राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या नावाने महिला क्रिकेट स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या बहुउद्देशीय सभागृहात झाला. प्रथम आलेल्या महाड पंचायत समिती संघाला या वेळी आकर्षक चषक देऊन मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

कोरोनाचे नियम पाळून पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम झाला. उपविजेता रायझिंग संघ आणि सहभागी जगदंबा शिक्षक संघ, दिशा ॲबॅकस संघांचाही सन्मान करण्यात आला. स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज करुणा कदम, उत्कृष्ट गोलंदाज पूर्वा बारटक्के, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक पल्लवीताई, सामनावीर मंजुषाताई आणि मालिकावीर अश्विनीताई ठरल्या. त्यांना गौरविण्यात आले. पंचगिरी बजावणारे राहुल सावंत, स्वप्नील



करकरे व प्रवीण जोशी यांनाही सन्मानचिन्ह देण्यात आले.

डॉ. दिगंबर गिते यांच्या संकल्पनेतून वेदा जनजागृतीच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत केल्या जाणाऱ्या कार्याचे व्यासपीठावरील सर्वच मान्यवरांनी कौतुक केले. पत्रकार संघाचे उपाध्यक्ष महेश शिंदे, कीर्तने गुरुजी, रोटरी क्लबचे अध्यक्ष द्वारकानाथ गुरव, महाड संकल्प सेवा ग्रुपचे संजय शेठ, नगरपंचायतीचे प्रतिनिधी प्रथमेश, पत्रकार जैतपाल, प्रा. विश्वास पाटील आदींनी डॉक्टरांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रल्हाद ठाकूर यांनी केले, तर आभार प्रा. शेगोकर यांनी मानले.

**प्रो कबड्डी लीग**

# यूपीकडून बंगळुरूचा धुव्वा; तर पुण्याने बंगालला नमवले


**बंगळुरू : वृत्तसंस्था**

प्रो कबड्डी लीगमध्ये रविवारी झालेल्या सामन्यात यूपी योद्धाने बंगळुरू बुल्सविरुद्ध ४२-२७ असा एकतर्फी विजय मिळवून इतिहास रचला. या सामन्यात यूपीकडून महाराष्ट्राचा सुपुत्र श्रीकांत जाधवने चांगली कामगिरी केली. तत्पूर्वी पहिल्या सामन्यात पुणेरी पलटणने गतविजेत्या बंगाल वॉरियर्सचा ३९-२७ असा पराभव केला. पुण्याच्या अस्लम इनामदारने कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी करीत १७ गुण मिळवले.

यूपी विरुद्ध बंगळुरू सामन्यात एका वेळी पूर्णपणे बंगळुरूचे वर्चस्व होते. त्यांना यूपीला अनेक वेळा ऑलआउट करण्याची संधी मिळाली. यूपीच्या बचावाने तीन सुपर टॅकलसह उत्कृष्ट कामगिरी केली आणि बंगळुरूवर सर्व दबाव टाकला. उत्तरार्धाच्या पहिल्या चढाईत यूपीने बंगळुरूला ऑलआऊट केले. यूपीच्या बचावफळीने आपले वर्चस्व कायम राखत त्यांना पुन्हा एकदा बाद केले. दरम्यान, बंगळुरूने सातत्याने गुण मिळवून एकतर्फी विजय मिळवला.

पहिल्या सामन्यात पुणेरी पलटणने पूर्वार्धात २०-११ अशी आघाडी घेतली होती. त्यांनी दुसऱ्या सत्राचीही जोरदार सुरुवात केली सरतेशेवटी सामना सहज जिंकला.

# नवी मुंबईतील क्रिकेट स्पर्धेत आरसीसी कुंभवडे संघ विजेता



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बत्तीस शिराळा स्पोर्ट्स असोसिएशन अंतर्गत शंकरदादा मोहिते स्पोर्ट्स सोनवडे यांच्या वतीने नेरूळमधील रामलीला मैदानात आयोजित शंकरदादा मोहिते चषक २०२२ क्रिकेट स्पर्धेत आरसीसी कुंभवडे संघाने विजेतपद पटकाविले. वॉरियर्स बिळासी संघ उपविजेता ठरला. यास समाधान मानावे लागले.

या राज्यस्तरीय स्पर्धेत नवी मुंबईसह महाराष्ट्रातील ३२ नामवंत संघांनी सहभाग घेतला होता. विजेत्या संघांना रोख रक्कम व चषक देऊन शिराळा पंचायत समिती सभापती सम्राट नाईक, प्रकाश पाटील, विवेकसिंग नाईक, प्रमोद साळुंखे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

उत्कृष्ट खेळाडू म्हणून मयूर पन्हाळकर, फलंदाज महेश डफळे, गोलंदाज नरेश कुंभवडे, क्षेत्ररक्षक सुहास चव्हाण यांची निवड करण्यात आली. त्यांनाही बक्षीस देण्यात आले. या स्पर्धेचे आयोजन असोसिएशनचे नेरूळमधील पदाधिकारी व सदस्यांनी केले होते.

## आरोग्य प्रहर

# सर्दी आणि खोकल्यावर आयुर्वेदिक काढे प्रभावी

हिवाळ्यात सर्दी-खोकल्याबरोबरच अनेक प्रकारचे आजारही सतावतात. सर्दीमध्ये लोकांची रोगप्रतिकारक शक्तीही खूप कमकुवत होते. जेव्हा छातीत श्लेष्म जमा होतो तेव्हा समस्या अधिक वाढते. तुम्हालाही हीच समस्या भेडसावत असेल, तर तुम्ही काढा पिऊ शकता. काढा प्यायल्याने शरीराला अनेक फायदे होतात.



इम्युनिटी वाढवण्यासाठी काही मसाल्याचे पदार्थ आणि औषधी वनस्पतींपासून एका काढ्याची निर्मिती करण्यात आली आहे. हा काढा तुम्हाला सर्दी, खोकला यासारख्या व्हायरल इन्फेक्शन्सपासून दूर ठेवतो, तसेच या काढ्याच्या सेवनाने तुमची इम्युनिटी वाढण्यासदेखील मदत होते.

* दालचिनीचा काढा-दालचिनी एक असा मसाला आहे जो अनेक प्रकारच्या घरगुती उपचारांमध्ये वापरला जातो. त्याची चवही खूप गरम असते. खोकला आणि श्लेष्म दूर करण्यासाठी हे खूप फायदेशीर मानले जाते. सर्वप्रथम एक ग्लास पाणी घ्या आणि त्यात दालचिनी पावडर, आले, तुळस आणि काळी मिरी घाला. ते चांगले उकळून गाळून बाजूला ठेवा. यानंतर त्यात मध घालून गरमागरम प्या. कफ आणि खोकल्याची समस्या दूर होण्यास मदत होते.

* आल्याचा काढा-आल्याचा प्रभावदेखील खूप गरम मानला जातो. हे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. हे तयार करण्यासाठी पाण्यात आले, तुळस, काळी मिरी, सेलेरी, हळद टाकून उकळवा. त्यात थोडा लिंबाचा रसही टाका. शेवटी मधदेखील घाला. ते गरम प्या. कफाची समस्या लगेच दूर होईल.

* ओव्याचा काढा-ओव्याचा प्रभाव खूप गरम असतो. सर्दी आणि खोकला बरा होण्यास मदत होते. याच्या वापराने छातीत जमा झालेला खोकला आणि कफ दूर होतो. त्याचा काढा बनवण्यासाठी प्रथम एक चमचा ओव्या घ्या आणि पाण्यात उकळा. त्यात गूळही घाला. १० मिनिटे उकळल्यानंतर पाणी गाळून प्या. दिवसातून किमान दोनदा ते प्या. काही दिवसातच तुम्हाला श्लेष्माच्या समस्येपासून आराम मिळेल.

काढ्यामुळे सर्वांत मोठा फायदा असा होतो की या काढ्यामध्ये वापरण्यात आलेले घटक हे उष्ण आहेत. त्यामुळे तुमचा सर्दीपासून बचाव होतो, तसेच या काढ्यामुळे रोगप्रतिकार शक्ती वाढण्यास मदत होत असल्याने तुमचा व्हायरल इन्फेक्शन्सपासून बचाव होतो.

# उलवे नोड प्रीमियर लीगचा जावळे संघ मानकरी

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बक्षीस वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर येथे उलवे नोड प्रीमियर लीग २०२२ ही क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ रविवारी (दि. ९) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाला. या स्पर्धेत निलेश इलेव्हन जावळे या संघाने विजेतेपद पटकाविले असून या संघाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

शिवाजीनगर येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणात पाच दिवस उलवे नोड प्रीमियर लीग ही क्रिकेट स्पर्धा रंगली. या स्पर्धेत संघमालक प्रमोद कडू यांच्या निलेश इलेव्हन या संघाने विजेतेपद पटकाविले, तर संघमालक सुधीर ठाकूर यांचा खारकोपर किंग्ज संघ उपविजेता





ठरला. स्पर्धेत मालिकावीर म्हणून प्रसाद घरत, उत्कृष्ट फलंदाज विनेश डोलकर, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक भानुदास म्हात्रे, उत्कृष्ट गोलंदाज राज बस्ताव यांची निवड करण्यात आली.

विजेते संघ आणि वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना बक्षीस देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या वेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, सदस्य रोशन म्हात्रे, आशिष पाटील, आयोजक सचिन घरत, सुधीर ठाकूर, अमर पाटील, अमर कडू, किशोर पाटील मनोज नाईक, धीरज ओवळेकर, प्रमोद कडू यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

# आवासच्या क्रिकेट स्पर्धेत गोंधळपाडा संघ विजेता



**अलिबाग** : वैभव राणे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आवास येथील जोगेश्वरी क्रीडा मंडळाने आयोजित केलेल्या क्रिकेट स्पर्धेत गावदेवी गोंधळपाडा संघाने विजेतेपद पटकावले. टायगरलेन सासवणे हा संघ उपविजेता ठरला.

आवास येथील जोगेश्वरी मैदानावर झालेल्या या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत ४० संघांनी सहभाग नोंदवला होता. ऋषभ शिलधनकर (सासवणे) याला उत्कृष्ट फलंदाज, सागर केसरकर (चोरोंढे) याला उत्कृष्ट गोलंदाज आणि राहुल पेडणेकर (गोंधळपाडा) याला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.

# चांदई संघाने केपीएल जिंकली

## खांडस संघ उपविजेता

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

कर्जत प्रीमियर लीगमध्ये चांदई सुपर किंग्ज संघाने विजेतेपद पटकावले, तर आगरी वॉरियर्स खांडस संघ उपविजेता ठरला.

पाच दिवस कशेळे येथील मैदानावर रंगलेल्या या स्पर्धेत एकूण २० संघांनी सहभाग घेतला होता. अंतिम सामना खांडस आणि चांदई या संघांमध्ये झाला. यात चांदई संघाने बाजी मारली. या संघात नितीन धुळे, शुभम बेलोसे, केदार भगत, मंगेश खेडेकर, संभाजी पथारे, विपूल ऐनकर, राहुल ऐनकर, कैलास मुणे, संदीप काळण, हरिभाऊ दहिफळे, किशोर भोईर, राहुल शिंगाडे यांनी आपल्या संघासाठी उत्कृष्ट कामगिरी केली, तर खांडस संघाचे मालक हरिश्चंद्र पांडुरंग भोईर व सुरेश दत्तात्रय ऐनकर यांनी आपल्या संघाचे नेतृत्व प्रवीण पथारे व उपकर्णधार संदीप हजारे यांच्याकडे सोपवले होते. त्यांचा संघ उपविजेता ठरला. विजेते संघ आणि विशेष कामगिरी बजावणाऱ्या खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.






## राम प्रहर अर्थसाक्षर प्रश्नमंजुषा

दैनिक राम प्रहरमध्ये दर रविवारी अर्थ प्रहर सदर प्रकाशित होते. या सदरातून वाचकांना अर्थविषयक माहिती देण्यात येते. ही माहिती 'राम प्रहर'च्या वाचकांसाठी लाभदायक ठरत असते. याच सदरात दर रविवारी आता वाचकांसाठी प्रश्नमंजुषा सुरू करण्यात आली आहे.

'अर्थसाक्षर' या शीर्षकाखाली दर रविवारी प्रश्नमंजुषेमध्ये वाचकांना तीन प्रश्न विचारण्यात येतील. या प्रत्येक प्रश्नासोबत चार पर्यायी उत्तरे दिली जातील. त्यातील योग्य उत्तर वाचकांनी निवडायचे आहे. निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या 7738106009 या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

या तिन्ही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तिन्ही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील. तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com